THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 16TH AUGUST 1894.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८८९ चा क्यांटोन्मेंट आक्ट सुधारण्याकरितां मसुदा.

सन १८८९ चा **क्यांटोन्मेंट आक्ट** सुधारणें ज्याअर्थी इष्ट आहे, त्याअर्थी खालीलप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) ह्या कायद्यास, **क्यांटोन्मेंट आक्ट** सुधारण्याकरितां सन १८९४ चा **आक्ट** असें ह्मणावें. — सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सगळ्या ब्रिटिश इंडिआस लागू आहे, आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

२. सन १८८९ चा **क्यांटोन्मेंट आक्ट**, ह्याच्या २६ व्या कलमांत खालील जास्त मजकुर दाखल करावा : तो मजकुर येणेंप्रमाणें :— — सन १८८९ चा आक्ट १३ वा, ह्याच्या २६ व्या कलमांत जास्त मजकुर दाखल करण्याबाबद.

" परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणत्याही स्त्रीला उपदंशाचा कोणताही रोग झालेला आहे किंवा नाहीं तें अथवा ती स्त्री कसब करण्यास योग्य आहे किंवा नाहीं तें निश्चित करण्यासाठीं त्या स्त्रीची वैद्यकीय अमलदारांकडून अगर इतरांकडून जबरदस्तीनें किंवा मुदतीमुदतीनें तपासणी करण्याचा हुकुम अगर परवानगी ज्यांत दिलेली आहे असा कोणताही नियम, किंवा कोणत्याही क्यांटोन्मेंटांत कसबिणींस परवाने देण्याकरितां अगर कसबिणींची नोंद ठेवण्याकरितां किंवा कसबाच्या कामास मंजुरी देण्याकरितां कोणताही नियम, सदर्हूप्रकारच्या कोणत्याही कानूमध्यें असूं नये. "

३. सदरील शेवटच्या कलमानंतर खालील कलम दाखल करावें :— — सन १८८९ चा आक्ट १३ वा, कलम २६, ह्यानंतर एक नवीन कलम दाखल करण्याबाबद.

" २६ अ. जो कोणताही सरकारी नोकर कलम २६ ह्याच्या विशेष ठरावांत सांगितलेल्या कारणांपैकीं कोणत्याही कारणासाठीं कोणत्याही स्त्रीस, तिची जबरदस्तीनें तपासणी केली जाण्यास भाग पाडील, त्यावर **क्यांटोन्मेंट मा**जिस्ट्रेटाच्या — कोणत्याही स्त्रीची जबरदस्तीनें तपासणी करण्याबद्दल शिक्षा.

कोटांत संक्षिप्त रीतीनें सदर्हू अपराधाच्या शाबितीचा ठराव झाला तर, तो शंभर रुपयेपर्यंत दंडाच्या शिक्षेस, अगर तो दंड न दिल्यास हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा ह्याच्या ६७ व्या कलमांत ठरविलेल्या शिक्षेस, पात्र होईल. "

---

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

नामदार सेक्रेटरी आफ स्टेट ह्यांकडून तारीख १४ माहे जून सन १८८८ चा खरिता आला त्यास अनुसरून हिंदुस्थान सरकारानें, कसबिणींची नोंद करण्याची व त्यांची जबरदस्तीनें तपासणी करण्याची वहिवाट क्यांटोन्मेंटांत बंद करण्यासाठीं तारीख २६ माहे जुलई सन १८८८ रोजीं कांहीं हुकुम फर्माविले. परंतु त्या हुकुमांचा उद्देश कितीएक बाबतींत चांगल्या रीतीनें सिद्धीस गेलेला नाहीं असें दृष्टोत्पत्तीस आल्यावरून, नामदार सेक्रेटरी आफ स्टेट इन् कौन्सिल ह्यांनीं, अशा तपासणीबद्दल शिक्षा ठरवून ती यापुढें होण्याचें बंद करण्यासाठीं, हें निरूपण ज्या मसुद्यास जोडलेलें आहे तो मसुदा कायदे कौन्सिलांत रुजू करावा असा हुकुम केला आहे. ह्मणून, मलिका मुआझमांच्या सरकारच्या हुकुमांस अनुसरून, हा मसुदा रुजू करण्यांत येत आहे.

(सही) अलेक्झां. एडवर्ड मिल्लर.

तारीख १० जुलई १८९४.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS